# सामान्य काळातील २८ वा रविवार



**तुझे असेल नसेल ते विकून गोरगरिबांना देऊन टाक व माझ्यामागे ये.**

# सा.का. २८ वा रविवार - वाचने

**ज्ञानग्रंथ ७ : ७-११** : मी देवाचा धावा केला व विवेकशक्ती मला लाभली. ती राजदंड, सिंहासन, सोने, चांदी, आरोग्य व सौंदर्य ह्यापेक्षा मला अधिक प्रिय आहे.

**इब्री ४:१२-१३** : देवाचे वचन सजीव, सक्रिय व तिष्ण असून ते मनातील विचार व हेतू ह्यांचे परीक्षक असे आहे.

**मार्क १०:१७-२७** : येशूने त्या श्रीमंत माणसाकडे निरखून पाहिले व त्याला म्हटले, "तुझे असेल नसेल ते विकून गोरगरिबांना देऊन टाक आणि चल, माझ्यामागे ये".

# दूताचा मरियेला संदेश

प्रभूच्या दूताने मरियेला संदेश दिला

आणि ती पवित्र आत्म्याच्या योगाने



गर्भवती झाली

नमो कृपापूर्ण मरिये ... . .

पहा मी प्रभूची दासी आहे

तुझ्या शब्दाप्रमाणे माझ्याठायी होवो

नमो कृपापूर्ण मरिये ... . .

आणि देवशब्द मनुष्य झाला



आणि आम्हामध्ये राहिला

नमो कृपापूर्ण मरिये ... . .

ख्रिस्ताने दिलेल्या वचनास

आम्ही पात्र व्हावे म्हणून

हे पवित्र देवमाते

आम्हासाठी विनंती कर .

आपण प्रार्थना करू याः



हे प्रभो, तुझ्या पुत्राच्या देह धारणाचा संदेश दूताने आम्हाला दिला. त्याच्या दुःखसहनाच्या व कुसाच्याद्वारे आम्हाला पुनरूत्थानाचे वैभव मिळावे म्हणून आमची मने तुझ्या कृपेने संपन्न कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

# प्रवेश गीत

धृ . भाव भक्तिची आज ही सुमने

घेऊन मी आलो

तुझीया पायी आज प्रभू मी



धन्य धन्य झालो



१.शब्द हे माझे आज अपुरे
स्तुती तुझी गाण्या
लाभू दे प्रभू तुझी कृपा
अन असो तुझी माया
तुझ्या कृपेचा याचक होऊनी
दारी तुझ्या आलो

Baptised and sent

# स्तुती गीत



परम इशाला स्वर्गात गौरव
सज्जनांना देव शांती देवो
आम्ही तव स्तुति करितो रे देवा
धन्यवाद नावा देतो सदा

भजन पुजन करितो रे सेवा
महिमा हो गावा मुखे नीत
प्रभू देवपित्या प्रभो परमेशा
विश्वेशा स्वर्गेशा शक्तीशाली



नमवुनि मान होतो ऋणवंत
तूचि भगवंत थोर जगी
प्रभो जगदिशा प्रभो येशूख्रिस्ता
एकुलत्या सुता गुणवंता

जनकनंदना परेशकोकरा
प्रभो दुःखहरा परमेशा
दयेच्या सागरा जगपापहारी
दया आम्हावरी करी त्वरा

पतितपावना जगपापहारी
प्रार्थना स्वीकारी अनाथांची
बैसला पित्याच्या उजव्या हाताशी
तूचि अविनाशी दया करी



परम पित्याच्या वसे ऐश्वर्यात
परम पवित्र आत्म्यासह
परम पवित्र तूचि प्रभूवर
तूचि एक थोर येशू ख्रिस्त

# प्रतिसाद स्तोत्र

प्रतिसाद ः

तू आपल्या दयेने
आम्हाला तृप्त कर.

## जयघोष

# आलेलुया, आलेलुया, आलेलुया

# श्रद्धेचे प्रकटीकरण

स्वर्ग आणि पृथ्वी, सर्व दृश्य व अदृश्य वस्तू ह्यांचा उत्पन्नकर्ता एकच परमेश्वर, सर्वशक्तिमान पिता ह्यावर मी श्रध्दा ठेवतो. आणि परमेश्वराचा एकुलता एक पुत्र येशू ख्रिस्त एकच प्रभू ह्यावर मी श्रध्दा ठेवतो. तो सर्व युगांपूर्वी पित्यापासून जन्मलेला आहे. परमेश्वरापासून परमेश्वर, प्रकाशापासून प्रकाश, ख-या परमेश्वरापासून खरा परमेश्वर, तो पित्याशी एकतत्व असून जन्मलेला आहे. उत्पन्न केलेला नाही. त्याजकडून सर्व उत्पन्न झाले

आहे. तो आम्हा मानवांसाठी व आमच्या तारणासाठी स्वर्गातून उतरला. तो पवित्र आत्म्याच्या योगाने कुमारी मरियेपासून शरीर धारण करून मनुष्य झाला. शिवाय आम्हासाठी त्याला कुसी दिले. पोन्ती पिलाताच्या अमदानीत त्याने दुःख भोगले, तो मरण पावला, त्याला पुरले. शास्त्राप्रमाणे तो तिसऱ्या दिवशी पुन्हा जिवंत झाला व स्वर्गात चढला आणि पित्याच्या उजवीकडे बसला आहे आणि जिवंतांचा व मृतांचा न्याय करावयास वैभवाने पुन्हा येणार आहे. त्याचा राज्याचा शेवट होणार

नाही. आणि पवित्र आत्मा, प्रभू व जीवनदाता यावर मी श्रध्दा ठेवतो. तो पिता आणि पुत्र यापासून निघतो आणि पिता व पुत्र यासहित त्याला भजतात व त्याचा गौरव करतात. तो भविष्य वाद्यांमार्फत बोलला आहे. आणि एकाच पवित्र, कॅथलिक व प्रेषितीय ख्रिस्तसभेवर मी श्रध्दा ठेवतो. पापक्षमेसाठी मी एक स्नानसंस्कार मान्य करतो. आणि मेलेल्यांचे पुनरूत्थान व भावी जगातील जीवनाची मी वाट पाहतो. आमेन.

# विश्वासू लोकांच्या प्रार्थना

प्रतिसाद



प्रभो, आमची प्रार्थना ऐक .

## अर्पण गीत

धृ. प्रेमे आणिली तुज अर्पिण्या,
भेट ही माझी स्वीकार तू
माझ्या पित्या, माझ्या पित्या



१. तनमन माझे सर्वचि तुझे
तुजविण मज प्रभू, कुणी न दुजे
आणियले हृदय देण्या

२ .द्राक्षारस भाकर आम्ही अर्पितो
रूधिर शरिरी तू परिवर्ती
जीवन नवे आम्हा देई प्रभू



# ख्रिस्तशरीर स्वीकार गीत

धृ.मन मंदिरी प्रभू आले हो मम नंदनवन फुलले

१.प्रेमदीप तो हृदयी आला

व्यथा मनिच्या हरपूनी गेल्या

धन्य प्रभु परमेश महान

करूया त्याचे जयगुणगान

दर्शन ते घडले मम नंदनवन फुलले



२ .तन माझे हे पावन झाले

मी पण माझे ख्रिस्तची बनले



पावन पावन ईश्वर नाम

करूया त्याला कोटी प्रणाम

मन हर्षाने न्हाले मम नंदनवन फुलले

## अंतिम गीत

धृ.देवाची सत्प्रीती किती महनीय




गगनि तारे पर्वत समुद्र

सर्वात महनीय सर्वात महनीय

१.अगम्य आनंदे हृदय हे भरले

विनवी देवाला बघुनी मन रमले

गगनी तारे पर्वत समुद्र सर्वात महनीय

२ .संकट समयी हे जीवन निरस वाटे

विनवी देवाला कंठ भारी दाटे




उत्तर देई प्रार्थनेच्या आधी

म्हणे मी तुजसंगती

३ .अंधारी दरीतून वाट भयंकर

मृत्यूचे भय फार दुःखाचे सागर

मेषपालासम चालवी मजला नच सोडी मजला

४ .देवाच्या मंदिरी स्तुति सदा करिते

संपूर्ण हृदयाने स्तवन मी करीन

स्तुतीस योग्य आहे दयाधन




आलेलुया, आमेन

धर्मप्रांतीय उपासना व संगीत आयोग, वसई